# प्रकरण पाचवे

## उपसंहार

# उपसंहार

मराठीतील प्रमुख समीक्षक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या समीक्षेचे स्वरूप कसे आहे व त्यांची उपयोजित समीक्षा जीवनवादाकडे कशी झुकली आहे या उद्देशाने प्रस्तुत लघुप्रबंधाचा अभ्यास केला आहे.

साहित्याच्या क्षेत्रात साहित्यकृती बाबत सामान्यतः जीवनवादी व कलावादी म्हणून ओळखले जाणारे असे दोन प्रवाह आढळून येतात. कलावादी विचारांच्या प्रवाहाचा विचार हा साहित्यकृतीचे स्वरूप, तिची निर्मिती, प्रयोजन आणि तिचा परिणाम हा अलौकिक व स्वतंत्र स्वरूपाचा असतो असे मानते तर नेमका त्याच्या उलट प्रत्यय जीवनवादी विचार प्रवाहात दिसून येतो. जीवनवादी विचार प्रवाह हा साहित्यकृतीचे स्वरूप, तिची निर्मिती, प्रयोजन आणि तिचा परिणाम हा लौकिकसंबद्ध असतो असे मानते. साहित्याच्या व समीक्षेच्या क्षेत्रात कधी कलावादी भूमिका वर्चस्व गाजवते तर कधी जीवनवादी विचार प्रवाहाचा प्रभाव वाढीस लागताना दिसतो. मराठी साहित्याच्या व समीक्षेच्या क्षेत्रात याचा वेळोवेळी प्रत्यय येतो. १९३० च्या दरम्यान मराठी साहित्यात जी " कलेसाठी कला की जीवनासाठी कला " ह्या वादाला सुरूवात झाली. या वादाचे समर्थक अनुक्रमे ना. सी. फडके व वि. स. खांडेकर हे होते. प्रथमतः कलावादी विचारांचा प्रभाव मराठी साहित्यावर होता असे दिसते. तरी १९६० नंतर त्याचा प्रभाव कमी होत जाऊन जीवनवादी विचारांचा प्रभाव वाढीस लागल्याचे दिसून येते.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे मुळात कलेसाठी कला याचे समर्थन करतात. त्यांची तात्त्विक समीक्षा ही कलावादाला वाहिलेली दिसून येते. पण त्यांच्या उपयोजित समीक्षेत मात्र त्यांची कलावादी भूमिका टिकत नाही तर ते जीवनवादी भूमिकेतूनच साहित्यकृतीचा आढावा घेताना दिसतात व त्यांची कलेसाठी कला ही भूमिका ढासळू लागल्याचे लक्षात येते. त्यांच्या समीक्षा व्यवहारातील या कार्याचा आढावा घेणे तसेच त्यांच्या समीक्षेत झुकते माप जीवनवादाकडे कसे झुकले आहे याचा प्रारंभापासून शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लघुप्रबंधात केला आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधाचा पहिल्या प्रकरणात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या जीवनाचा थोडक्यात आढावा घेऊन त्यांच्या साहित्य संपदेचा तपशील नोंदवला आहे. नंतर त्यांच्या उपयोजित समीक्षेचे स्वरूप समजून घेण्यासाठी आधी त्यांच्या तात्त्विक समीक्षेचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास साहित्याचे स्वरूप, प्रयोजन व परिणाम या अंगाने केला आहे.

सुरवातीला समीक्षेचे स्वरूप गुंतागुंतीचे कसे आहे ? तसेच समीक्षा करणे म्हणजे एखाद्या गोष्टीकडे परिपूर्ण पाहणे याचा विचार करून भारतीय व पाश्चात्य विचारवंतांची समीक्षेबद्दलची मते पाहिली आहेत. समीक्षेच्या तत्त्वांची मीमांसा करणारी तात्त्विक समीक्षा व साहित्यकृतीचे रसग्रहण करणारी उपयोजित समीक्षा असे समीक्षचे' दोन्ही प्रकार पाहिले. साहित्याची निर्मिती ही आधी होत असते व नंतर तिचे मूल्यमापन होत असते तर काही वेळा साहित्य व समीक्षा एकाचवेळी अवतरताना दिसून येते हे पाहिले. समीक्षेचे पहिले प्रयोजन ग्रंथाची वाचकास ओळख करून देणे. वाचकास ग्रंथ वाचण्यास प्रवृत्त करणे, उत्कृष्ट-निकृष्ट यांची तुलना करुन कलाकृतीचे स्थान निश्चित करणे हे आहे. तसेच चांगल्या समीक्षकाचे नाते हे तिन्ही काळाशी निगडीत असते हे ना. वा. गोखले व गं. ना. जोगळेकर यांचे मत ग्राह्य धरुन समीक्षा शास्त्र आहे की कला या वादाचाही येथे परामर्श घेतला आहे. इतिहास, मानसशास्त्र याप्रमाणे समीक्षेला शास्त्र मानण्यास हरकत नसावी. तसेच कवी जसे स्फूर्तीमध्ये काव्य निर्माण करीत असतो तसे समीक्षकही काहीवेळा स्फूर्तीने समीक्षा करीत असल्याचे दिसते. त्यामुळे ती एक कलाही ठरते हे पाहिले. तसेच कलावाद व जीवनवाद या १९३० नंतर उदयास आलेल्या वादाचे स्वरूप पाहिले व त्यासाठी कलावाद म्हणजे काय ? याचा विचार केला व त्यासाठी रा. भा. पाटणकरांच्या कलेच्या बाबतीतला ' कलेची द्विध्रुवात्मकता ' हा सिद्धान्त महत्त्वाचा आहे. त्यात कालानुक्रमे लौकिकतावाद हा अलौकिकतावादाच्या आधी येतो या त्यांच्या मनाचा स्वीकार करून कांटची कलेबाबतची मते यात सौंदर्यानुभव हा अस्तित्व-निरपेक्ष असतो. तसेच वास्तवातील गोष्टींना जसे सत्ताशास्त्रीय स्थान असते तसे स्थान कलाकृतीतील पात्रांना, घटकांना नसते. सौंदर्यानुभवात निश्चित संकल्पना नसतात. हेतुशून्य हेतुपूर्णतेचे किंवा नियमरहित

नियमिततेचे तत्त्व हे सौंदर्याचे तत्त्व असते म्हणून कलाकृती ही अनन्यसाधारण असते असे कांट तसेच विश्वचैतन्यवाद्यांचे मत पाहिले. कलावादामध्ये कला हेच एक स्वायत्तमूल्य मानले की लौकिक जीवनमूल्यांशी त्यांचा संबंध नाही अशी भूमिका आपोआपच घेतली जाते. कांटने सौंदर्याचे स्वायत्त सौंदर्य व परामत्त सौंदर्य असे दोन भाग कल्पिले आहेत. एखाद्या वस्तूचे सौंदर्य पहात असताना तिच्यापासून आपल्याला अस्तित्त्व-निरपेक्ष, सार्वत्रिक असा आनंद मिळत असेल तर तो आनंद स्वायत्त सौंदर्यात मोडतो. फुले अनेक जातीचे पक्षी, वेलबुट्टीचे नक्षीकाम, शब्दरहित संगीत ही सर्व स्वायत्त सौंदर्याची उदाहरणे होत तरपरायत्त सौंदर्यात ती वस्त कशी असायला हवी व तिचे परिपूर्ण स्वरूप कोणते हे महत्त्वाचे ठरते. घोडा व त्यासारखी जनावरे, राजवाडा, शस्त्रागार इत्यादी इमारतीचे सौंदर्य ही परायत्त सौंदर्याची उदाहरणे आहेत. खुद्द मानवाचे सौंदर्य हे परायत्त सौंदर्यात मोडते असे कांट सांगतो. कांटच्या सौंदर्य सिद्धान्ताचा परिणाम विश्वचैतन्यवाद्यांच्या भूमिकेवरही झालेला आढळून येतो. विश्वचैतन्यवादीही कांटप्रमाणेच साहित्यकृतीमागे लौकिक प्रेरणा प्रयोजने नसतात असे म्हणतात. सौंदर्यानुभवातील आनंद हा इतर क्रियाव्यवहारापेक्षा भिन्न स्वरूपाचा ब्रह्मानंदसहोदरासारखा असून अस्तित्त्व-निरपेक्ष असतो. याच पायावर भारतीय साहित्यशास्त्रातील कलावादी विचार उभा आहे.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आपल्या तात्त्विक समीक्षेत कलावादी भूमिका स्वीकारून लेखन करताना दिसतात. ते आपली तात्त्विक समीक्षेचे स्वरूप मांडताना साहित्यकृतीचे रूप, रचना, आकार यांचा विचार कलावादी भूमिकेतून मांडतात. द्वितीय महाराष्ट्र कवि संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना श्रीपाद कृष्ण रचना सौष्ठत्वाचा विचार व्यक्त करतात व कवितादेवीला दासी करु नये अशी गळ घालतात व नीतीला त्याज्य मानतात. येथे ते कार्यकारणभावाला महत्त्व न देता कवीस आपली वृत्ती बनविताना कल्पनेतून वाटेल तो चटकदार विषय व तो सजविण्याकरिता वाटेल ते साहित्य घेण्याची आणि त्याची वाटेल तशी उत्कर्षपर रचना करण्याची पूर्ण मुभा असते असे म्हणतात.

श्रीपाद कृष्ण आपल्या तात्त्विक समीक्षेत साहित्यकृतीच्या स्वरूपाचा विचार जसा कलावदी भूमिकेतून करतात. तसेच त्याच्या प्रयोजन व परिणामाचाही विचार कलावादी भूमिकेतून करतात.

यात त्यांनी ' मनोरंजन ' ही संकल्पना प्रामुख्याने वापरली आहे व काव्यानंद हा व्यावहारिक आनंदाहून भिन्न आहे असे म्हणतात. " जर एखादा ग्रंथ मनोरंजनाच्या दृष्टीने उत्कृष्ट असला पण त्यात कोणताही बोध ग्रथित नसला, किंबहुना त्यातील मजकूर अज्ञानजन्य किंवा अनीतिपर असला तर त्याीच ललित वाङ्मयातील योग्यता किंचितही कमी होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे व ते साहित्यनिर्मितीत नीतिप्रतिपादनाचा हेतू नसतो असे म्हणतात.

कोल्हटकर आपल्या तात्त्विक समीक्षेच्या परिणामाचा विचार करताना रसविचारास प्राधान्य देतात. विदर्भवीणेला दिलेल्या प्रस्तावनेत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर रस किंवा भाव याचा अर्थ मन:क्षोभ हा असून, विकारित्व अगर चढउतार हे त्याचे लक्षण होय असे सांगतात. त्यांनी शांतरसास रसांमध्ये स्थान दिले आहे. पण यास गौणत्व दिले आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी करुणरसापासून आनंद का होतो याचा विचार केला आहे. या विचारात त्यांची कलावादी भूमिका दिसून येते. त्यांच्या मते, " प्रत्येक रसाचा वरील थर सुखदु:खाचा असला तरी आतील थर आनंददायकच असतो." " उदात्त वर्णनात सौंदर्यही अभिप्रेत असल्यामुळे उदात्त वस्तूच्या वर्णनाने आनंदच होतो." साहित्यकृतीतील संकटे काल्पनिक पात्रांवर येत असल्यामुळे आपल्या स्वार्थास धक्का बसत नाही म्हणून आनंद होतो."

प्रस्तुत लघुनिबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात श्रीपाद कृष्णांच्या उपयोजित समीक्षेतील साहित्यकृतीच्या स्वरूपाचा विचार केला आहे. हा विचार करताना ' विक्रम-शशिकला', ' संगीत सौभद्र ', ' संगीत नाटकत्रय ', ' माधवनिधन ', ' संगीत शापसंभ्रम ', ' संगीत प्रेमाभास', ' तोतयाचे बंड ' या (नाटकावरील) परिक्षणलेखाचा तसेच ' पण लक्षात कोण घेतो ! ', ' रागिणी ', ' मुक्ता ' या कादंबरीवरील परिक्षणलेखाचा तसेच ' दोन सामाजिक नाटके' ' मॅक्वेथ नाटकाची दोन भाषांतरे ', ' सद्य:स्थितिप्रेरित दोन नवी नाटके ', ' तुलसीरामायण ' या टीकालेखांचा आधार घेतला आहे. श्रीपाद कृष्ण साहित्यकृतीच्या संदर्भात जेंव्हा तात्त्विक भूमिका मांडू लागतात तेव्हा साहित्याचे स्वरूप, प्रयोजन किंवा निर्मिती प्रक्रिया आणि परिणाम या संदभ्रात अलौकिकतेच्या बाजूनेच चर्चा करतात. मात्र जेंव्हा प्रत्यक्ष साहित्यकृतीच्या संदर्भात

बोलू लागतात. तेंव्हा त्यांची कलावादी भूमिका डळमळू लागते व ते त्यांच्या नकळत जीवनसंबद्ध निकष वापरू लागतात. त्यांची उपयोजित समीक्षा कलावादी भूमिकेला विसंगत अशा स्वरूपाची झाली आहे. त्यांची बरीचशी उपयोजित समीक्षा परीक्ष्य ग्रंथातील आशयाच्या प्रतिपादनाला आणि तिच्या निमित्ताने समाजातील वाईट चालीरूढींचे खंडन करण्याला वाहिलेली दिसून येते. ' विक्रम शशिकला ' या नाटकाची चर्चा ते नैतिकतेच्या संदर्भातच करतात. ' शापसंभ्रम ' नाटकातून ज्ञान मिळत नाही अशी तक्रार ते करतात. ' पण लक्षात कोण घेतो !' या कादंबरीची थोरवी सामाजिक प्रश्न मांडण्यात आहे असे त्यांना वाटते. कोल्हटकर साहित्यकृतीचा सत्ताशास्त्रीय विचार करतना प्लेटोच्याच मताचे समर्थन करून कार्यकारणभावाला आशयप्रधानतेला तसेच नीतिबोधाला अधिक महत्त्व देतात. कोल्हटकर नाटकाचा मूळ उद्देश ज्ञान देणे हा नाही असे म्हणत असले तरी नाटकातून एखादा उपदेश घेण्यासारखा असेल तर तो जरूर घ्यावा असे म्हणतात. ' संगीत शापसंभ्रम ' या नाटकात ते ज्ञानाची अपेक्षा करतात. तसेच तत्कालीन समाजात रूढ असलेल्या केशवपन, जरठ-कुमारी विवाह, स्त्रियांवरील अत्याचार या संदर्भात सुधारणावादी दृष्टिकोण स्वीकारतात व अशासारख्या रूढींचे समूळ उच्चाटन होण्याकरिता ' पण लक्षात कोण घेतो !' या सारख्या कादंबऱ्या महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत हे लक्षात आणून देतात. साहित्यातून सामाजिक सुधारणांचा प्रचार व्हायला हवा असे त्यांचे आग्रही मत असल्याचे दिसते. तसेच ते साहित्यकृतीबाबत नीती-अनीती, श्लील-अश्लील याचाही विचार आवर्जून करतात. श्रीपाद कृष्ण आपल्या जवळजवळ सर्वच टीकालेखात नीतीचा मुद्दा उचलून धरतात व समाजविघातक कार्यास ते आपला निषेध नोंदवतात. याबरोबरच श्रीपाद कृष्ण साहित्यकृतीतील कार्यकारणभाव व तार्किकता याकडेही लक्ष पुरवतात. त्यांनी केलेला साहित्यकृतीतील भाषाविचार व रचनाविचार त्यांच्यातील वैयाकरणी स्वभावाचा व सूक्ष्म दृष्टीचा प्रत्यय आणून देणार असा आहे. त्यांनी बाराव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात भाषाविचाराचा बारकाईने अभ्यास केला आहे. तसेच ' मराठी वाङ्मय व स्वावलंबन ' या लेखात त्यांनी शास्त्रग्रंथातील भाषा व काव्य वाङ्मयाची भाषा यात त्यांनी भेद केलेला आहे. " निव्वळ शास्त्रीय ग्रंथात संदिग्धता टाळणे

अवश्य असल्यामुळे त्यास एकाच साच्याचे गद्य अनुरूप असते. उलटपक्षी, काव्यात चमत्कृति अभिप्रेत असल्यामुळे त्यातील शब्दात वैचित्र्य असून, त्याचा क्रम त्या हेतूस पोषक असावा लागतो " असा विचार ते मांडतात.

आपले टीकालेखन करीत असताना ते साहित्यकृतीतील व्याकरणिक चुकाही ते बारकाईने दाखवून देतात. ' विक्रम-शशिकला ', ' संगीत सौभद्र ', ' सद्यस्थितिप्रेरित दोन नवी नाटके ' इत्यादी ग्रंथातील शुद्धलेखनातील ऱ्हस्वदीर्घाच्या चुका त्यांनी निदर्शनास आणून दिल्या आहेत. ' संगीत सौभद्र ' नाटकात किर्लोस्करांकडून पद्यात मात्रांच्या अनेक चुका कोल्हटकरांनी दाखवून दिल्या आहेत. वा. ल. कुलकर्णी आपल्या ' श्रीपाद कृष्ण वाङ्मय दर्शन ' या ग्रंथात श्रीपाद कृष्णांच्या बद्दल म्हणतात, " कोल्हटकरांचे मन गणिती आहे. काटेकोरपणे विचार करणे, एकामागून एक मुद्दे मांडणे, बारीक-सारीक तपशील देखील काळजीपूर्वक तपासून टाकणे व त्यातील गुणदोषांची नोंद करणे, व्याख्या करणे, वर्गीकरण करणे, वर्गीकरणाच्या पद्धती तपासणे, त्यातील अधिकात अधिक निर्दोष कोणती ते ठरविणे हा त्या मनाचा आवडता व्यवसाय आहे." ' संगीत सौभद्र ' नाटकाचा विचार ते रचनेच्या दृष्टिकोणातून करतात. ते म्हणतात, " गर्गमुनीसारख्या आगंतुक पात्राकडून कथानकातील सर्वात बिकट प्रसंग पार पाडणे हे कलेच्या दृष्टीनेही चांगले नाही. ' तोतयाचे बंड ' या नाटकाच्या रचनेचा विचार करताना या नाटकात साध्येतर भागांचे चित्ताकर्षत्वाचा भाग जास्त दिसतो असे मत नोंदवतात. तर ' रागिणी ' या कादंबरीत अनेक वादविवादाच्या प्रसंगी भिन्नभिन्न व्यक्तींनी भिन्नभिन्न बाजू घेतल्यामुळे त्यांच्या स्वभावावर चांगला प्रभाव पडला आहे असे सांगतात. ' संगीत प्रेमाभास ' नाटकातील कालसंबंधीचा विसंगतपणा त्यांनी वाचकांच्या नजरेस आणून दिला आहे. ' मॅक्बेथ नाटकाची दोन भाषांतरे ' या टीकालेखात जोशी यांच्या ' डाकिनीविलास ' या नाटकावरील भाष्यात " हुजऱ्यांचा व मॅक्बेथचा जो मुका प्रवेश रा. रा. जोशी यांनी नवीन घातला आहे तो व लेडी मॅकडफ, तिचा मुलगा व मारेकरी यामधील प्रवेशाचा लांबविलेला भाग यांचा प्रेक्षकांवर इष्ट परिणाम न होता ते उलट हास्यास्पद होतील असा सूक्ष्म विचार करतात. येथेही ते रचनेचा

विचार प्रामुख्याने करतात. ' संगीत शापसंभ्रम ' बद्दल ते म्हणतात, " नाटकाची एकंदर भाषा आरंभापासून शेवटपर्यंत साधी व मनोरम घातली आहे व बाणाचा मुख्य गुण जो शब्दलालित्य यांचा सर्रास उपयोग करून घेतला आहे. शोक, शृंगार इत्यादी प्रधान रस काही ठिकाणी अत्युत्तम साधले आहेत." तसेच ' वीरतनयाची ढाल ' या टीकालेखाचे स्वरूप हे या नाटकावरील रा. खरे यांनी लिहिलेल्या टीकालेखाचे प्रत्युत्तरादाखल केलेले भाष्य या प्रकारचे आहे.

श्रीपाद कृष्ण साहित्यकृतीच्या स्वरूपाचा विचार करताना औचित्य-अनौचित्याचा मुद्दा उचलून धरतात. तसेच ' तोतयाचे बंड ' या नाटकातील संविधानकाच्या सेंद्रियत्त्वाचाही ते सूक्ष्म अभ्यास करतात.

त्यांनी रसविचाराचा जो विचार केला आहे त्यात रसविघ्नाचा विचार केला आहे. तसेच काव्यात औचित्य नसेल तर रसिकास त्याचा आस्वाद पूर्णपणे घेता येत नाही. त्यात व्यत्यय येतो असे मत मांडले आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात कोल्हटकरांच्या उपयोजित समीक्षेतील साहित्यकृतीच्या प्रयोजनाचा विचार केला आहे.

साहित्यकृतीचा हेतू ब्रह्मास्वादसहोदर अशा आनंदाच्या प्राप्तीचा असतो असे अभिनवगुप्त, मम्मट यांचे म्हणणे आहे. मम्मटाच्या मते कविसृष्टी अनन्यपरतंत्र असते. कविसृष्टी नियमरहित असते असे मम्मट म्हणतो. काव्यप्रयोजनाबद्दल भरताने नाट्यप्रयोगाचे दोन प्रमुख उद्देश सांगितले आहेत. लोकांची करमणूक होऊन त्यांना दैनंदिन जीवनातील श्रमाचा विरंगुळा वाटावा व थोडाफार सुखाचा लाभ व्हावा यालाच सांत्वन म्हटले आहे व त्यांया बुद्धीला चालना मिळून काहीसा बोध व्हावा यास उद्बबोधन म्हंटले आहे. विश्वनाथाने साहित्याच्या प्रयोजनार्थ धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थाचा उल्लेख केला आहे. तसेच पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांनी साहित्याच्या प्रयोजनात इच्छातृप्ती किंवा वासनातृप्ती, आत्माविष्कार आणि अनुभव यांचा उल्लेख केला आहे.

प्लेटोने आपल्या नीतिवादी सिद्धान्तात केलेल्या बाबतीत साहित्याला नैतिक निकष लावले आहेत. " काव्याने आनंद मिळतो आणि जर आपल्या आदर्श राज्यात कवींना स्थान देता

आले असते तर ते त्याला आवडले असते. पण काव्यामुळे मानवी व्यक्तिमत्त्वावर वाईट परिणाम घडतात आणि म्हणून तिला मोठ्या नाईलाजाने हद्दपार करावे लागत आहे.'' असे तो म्हणतो. प्लेटोचा शिष्य ॲरिस्टॉटल यांची कलेबाबतची मते प्लेटोपेक्षा थोडी भिन्न आहेत. त्याच्यामते, '' कलामूल्य व नीतिमूल्य ही वेगळी असली तरी कला नीतीला पोषकच असते.'' '' सौंदर्याच्या नावाखाली अनाचार, अनीती यांना कलावंताकडून आणि विचारवंताकडून प्रोत्साहन मिळते ही टॉलस्टॉयच्या मते फार अस्वस्थ करून टाकणारी गोष्ट आहे हे बंद झाले पाहिजे असे तो म्हणतो. रिचर्डस्, जॉन ज्युई, शेली, सार्त्र, फेडरिक एंगल्स यांनीही वाङ्मयाचे समाजातील स्थान कोणते हे सांगितले आहे व आपला जीवनवादी दृष्टिकोण सिद्ध केला आहे.

मार्क्सवादानेही साहित्यावर आपली मोहर उठविली आहे. मार्क्सवाद्यांच्या मते कोणत्याही कलाप्रकाराचे व कलाकृतीचे रहस्य समजायचे असेल तर तिच्या मुळाशी असलेल्या अर्थव्यवस्थेकडे लक्ष द्यायला हवे. तसेच रा. भा. पाटणकरांनीही आपला नीतिविषयक दृष्टिकोण मांडला आहे. ते म्हणतात, '' कलाकृती जीवनाला जितक्या जास्त गंभीरपणे सामोरी जाते तितकी तिच्यातील नैतिक बाजू महत्त्वाची होत जाते.''

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनीही आपल्या उपयोजित समीक्षेत साहित्यकृतीच्या प्रयोजनाविषयी नीतिवादी दृष्टिकोण स्विकारलेला आहे. ते आपल्या उपयोजित समीक्षेत प्रयोजनाचा विचार करताना नीतिप्रतिपादन, तत्त्वप्रतिपादन, सामाजिक बांधिलकी या गोष्टींना महत्त्व देतात. श्रीपाद कृष्ण ' रागिणी ' या वा. म. जोशी यांच्या कादंबरीबद्दल बोलताना म्हणतात, '' त्यांच्या सर्व लेखातून त्यांची तत्त्वशोधनाची व वादविवादाची दांडगी हौस दृष्टीस पडते. त्यातून तत्त्वज्ञानविषयक व नीतिविषयक ग्रंथाचे मार्मिक परिशीलन झाल्यासारखे दिसते.'' तसेच साहित्यकृती एखादी नीती शिकवते का ? त्यातून सामाजिक सुधारणांना वाव मिळतो का ? याकडेही लक्ष देतात. सामाजिक सुधारणेच्या दृष्टिकोणातून ' पण लक्षात कोण घेतो !' ही हरिभाऊ आपटे यांची कादंबरी तसेच ' दोन सामाजिक नाटके व ' संगीत प्रेमाभास ' या नाटकांतर्गत सामाजिक सुधारणेविषयी विचार केला आहे. ' संगीत प्रेमाभास ' या ठोसर यांच्या

नाटकाचा हेतू आधुनिक वैवाहिक सुधारणेकडे असल्याचे सांगितले आहे. ‘ दोन सामाजिक नाटके ’ या अंतर्गत ‘ संगीत रूढिविनाशन ’ नाटकात बालविवाह, जरठोद्वाह, विधवाविवाह, केशवपन इत्यादी सामाजिक विषय आले आहेत. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आपल्या तात्त्विक समीक्षेत कलावादी भूमिका घेताना नीतिबोधाचा हेतू वेठीस धरू नये असे जरी म्हणतात तरी उपयोजित समीक्षा करताना ते जीवनवादी दृष्टिकोणातूनच साहित्याकडे पाहतात व एखाद्या साहित्यकृतीतून काही उपदेश घेण्यासारखा आहे का ? याची चिकित्सा करतात. ज्ञान देणे हा कलेचा खरा उद्देश नाही असे आपल्या कलावादी भूमिकेत म्हणतात पण त्यांचा हा उद्देश उपयोजित समीक्षा करताना ढासळताना दिसतो. मनोरंजनाबरोबरच त्यातून ज्ञानप्राप्ती होते का ? याचाही ते विचार करतात. ‘ विदर्भवीणा ’ या ग्रंथाला प्रस्तावना देताना ते बोधाचाच विचार करतात.

साहित्यातून जीवनदर्शन झाले पाहिजे असे जीवनवादी तत्त्वज्ञ मानतात. साहित्य हे समाजातूनच जन्माला येत असल्याने त्याने समाजाला बोध देण्याचे कार्य केले पाहिजे. जीवनवाद्यांच्या या विचार प्रणालीला धरूनच कोल्हटकर आपला उपयोजित समीक्षेतील प्रयोजनविचार मांडतात व साहित्यकृतीने एखादे जीवनविषयक तत्त्वज्ञान वाचकांसमोर मांडावे अशी अपेक्षा करतात. याबरोबरच सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून ते साहित्याने प्रचार करावा असे मत मांडतात. साहित्यातून काही विशिष्ट विषयांचा प्रसार करणे शक्य आहे व गरजेचेही आहे असे श्रीपाद कृष्णांना वाटते. ‘ प्रचार ’ हे तत्कालीन समाजातील अनिष्ट रूढींवर रामबाण औषध असल्याचे त्यांचे मत आहे असे वाटते. ‘ पण लक्षात कोण घेतो !’ यासारख्या कादंबऱ्या समाज जीवनातील अंतरंगावर प्रकाश टाकून समाजात परिवर्तन घडवून आणण्याची महत्त्वाची नैतिक जबाबदारी पार पाडीत आहेत असे त्यांना वाटते. साहित्यातून नीतीचा, सामाजिक मूल्यांचा, स्त्री शिक्षणाचा, त्यांच्यावरील अन्यायाचा, सुधारकी विचारांचा प्रचार व्हावयास पाहिजे याकडे ते लक्ष पुरवतात.

प्रस्तुत लघुशोधप्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात श्रीपाद कृष्णांच्या उपयोजित समीक्षेतील परिणामाचा विचार मांडला आहे.

श्रीपाद कृष्ण आपल्या तात्त्विक समीक्षेत साहित्यकृतीच्या परिणामाचा विचार करताना आनंद, तादात्म्य, मनोरंजन या संकल्पना वापरतात. पण त्यांच्या उपयोजित समीक्षेत परिणामाचा विचार करताना नीतिबोध, श्लील-अश्लील, संस्कार यांचा विचार करतात. उपयोजित समीक्षेत जीवनविषयक साहित्यातून आनंदनिर्मिती होते असे मत ते प्रतिपादन करतात. नीतीच्या संदर्भात ते ' विक्रम-शशिकला ' या साधारण नाटकाचा देखील ते खरपूस समाचार घेतात. कारण त्यांना प्रस्तुत नाटक लवकरच लोकांच्या अभिरुचीचा व नीतीचा धुडगूस उडवून देईल अशी त्यांना भीती वाटते.

' रागिणी ' ही कादंबरी कोल्हटकरांना तात्त्विक स्वरूपाची कादंबरी वाटते. शास्त्रीय व तात्त्विक वाङ्मयाच्या वाचनाने वाङ्मयाबद्दल जिज्ञासा उत्पन्न होते असे त्यांचे मत आहे. येथे कोल्हटकर कृतिप्रवणतेचा विचार करतात. आनंद ही संकल्पना अलौकिक तसेच लौकिकही आहे असे त्याच्या एकंदर समीक्षेचे स्वरूप पाहता लक्षात येते. जीवनविषयक साहित्यग्रंथातून आनंदनिर्मिती प्रत्ययाला येते असे कोल्हटकरांना वाटते, त्यासाठी ते ' तुलसीरामायण ' या चरित्रग्रंथाचे उदाहरण देतात. त्यातील अनेक वर्णने उत्कृष्ट अशी आहेत. ती वाचतांना वाचकांच्या वृत्ती विषयाशी पूर्णपणे तद्रूप होतात व शृंगार, वीर, करुण इत्यादी रसांनी त्यांचे हृदय उचंबळून जाते. ' पण लक्षात कोण घेतो !' या कादंबरीचा उल्लेख ते ' सामाजिक कादंबरी ' म्हणून करतात व अशा प्रकारचे साहित्य निर्माण होण्याची गरज असल्याचे सांगतात. तत्कालीन समाजात प्रचलित असलेली केशवपनाची चाल, इतर अनेक अनिष्ट रूढी परंपरा, जरठ-कुमारी विवाह यासारख्या चालीरीती बंद पाडल्यास यामुळे साहाय्य होईल असा विश्वास त्यांनाा वाटतो. याबरोबरच ते श्लील-अश्लीलतेचाही बारकाईने विचार करतात. साहित्यातून दर्शविलेली अश्लीलता समाजावर विघातक परिणाम करीत असल्याने अश्लील गोष्टीस ते पूर्णपणाने विरोध करतात. तसेच ' संगीत शापसंभ्रम ', ' चंद्रसेना ' ही नाटके, ' मुक्ता ' या कादंबरीचाही ते श्लील-अश्लीलतेच्या दृष्टिकोणातून विचार करतात. उलट साहित्यकृतीतून एखादा चांगला गुण घेण्यासारखा असला तर तो जरूर घ्यावा असे मत प्रतिपादन करतात. त्याकरीता श्री. नाटेकर

लिखित ' मातृशिक्षाप्रभाव ' या संस्कारक्षम नाटकाची बरीच स्तुती करतात. कोल्हटकर ''शेक्सपीयरची नाटके व गेटीच्या कथा व कादंबऱ्या, कालिदासाची व भवभूतीची नाटके अशा श्रेष्ठ ग्रंथांच्या वाचनाने वाचकांची कल्पना व विवेकशक्ती यामध्ये समतोलपणा उत्पन्न होण्यास बरेच साहाय्य होते '' असे म्हणतात. एस्चायलस् व सॉफोक्लीज या ग्रीक ग्रंथकारांच्या नाटकांची शुद्ध व उत्कट मनोवृत्ती उत्पन्न करण्यासंबंधाने फार प्रसिद्धी आहे. तेव्हा तीही मराठी वाचकांच्या हाती पडावी अशी त्यांची इच्छा आहे.

कोल्हटकरांनी कलाकृतीचा सेंद्रिय परिणाम या विषयाचा सूक्ष्म अभ्यास केला आहे. याबाबत ते म्हणतात, '' ज्याप्रमाणे अनेक किरण एकाच केंद्रात पडले असता ती जागा प्रकाशमान व स्पष्ट दिसावयास लागते त्याचप्रमाणे प्रत्येक प्रवेशाचे वाक्याचे, किंबहूना शब्दाचे एकाच गोष्टीत पर्यवसान होईल, अशा रीतीची त्यांची योजना केल्यास ती गोष्ट प्रेक्षकांच्या मनावर चांगली ठसते. पण एकीच्या पाठोपाठ दुसरी, तिच्यामागून तिसरी अशाप्रकारे एक धड ना भाराभर चिंध्या प्रेक्षकांपुढे मांडल्यास त्यांचे मन पूर्ववत कोरेचे राहते. ''

कोल्हटकरांनी रसविचार तसेच रसविघ्नाचाही तपशीलाने विचार केला आहे. त्यांच्या रसविचारात लौकिक भूमिकेचाच जास्त प्रत्यय येतो. ' तोतयाचे बंड ' च्या नाटककर्त्याला उद्देशून ते म्हणतात, केळकरांना हसविण्याची तसेच रडविण्याची विद्या सारखीच अवगत आहे. त्यातील हास्यरस व करुणरसपूर्ण प्रवेश मराठी नाटकातील कोणत्याही प्रवेशला हार जाण्यासारखे नाहीत असे त्यांचे मत आहे.

रसविघ्नाचा विचार करताना ते ' संगीत सौभद्र ' नाटकाचा तसेच ' रागिणी ' या कादंबरीचा उल्लेख करतात. नाट्यशास्त्राच्या संकेताप्रमाणे स्वगत भाषणे प्रेक्षकांस जरी ऐकू गेली, तरी इतर पात्रास ऐकू जात नाही असे समजावयाचे या संकेताचा ' संगीत सौभद्र ' या किर्लोस्करांच्या नाटकात भंग झाला असल्याचे कोल्हटकर म्हणतात. तसेच ' रागिणी ' या कादंबरीत अस्वाभाविकपणा व अप्रासंगिकपणा याप्रमाणेच विसंगती व दुर्बोधतेमुळेही वाचकांच्या तल्लीनतेचा भंग झाल्याचे सांगतात.

पुस्तकातील भाषा जर अशुद्ध, पाल्हाळिक व निरर्थक असल्यास कालांतराने कोणी वाचेनासे होऊन ती लयाला जाते. त्यासाठी व्याकरणिक चुकांकडे लक्ष पुरवून पुस्तकातील भाषा अतिशय काटेकोर असावी व त्यासाठी गद्यलेखकांनी अवश्य लक्ष पुरवावे अशी पुस्ती ते जोडतात.

सारांश, तात्त्विक समीक्षेत कलावादी भूमिका घेणारे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर साहित्यकृतीच्या उपयोजित समीक्षेत प्राय: जीवनसंबद्ध भूमिका स्वीकारून परीक्ष्य ग्रंथांचा विचार करतात असे दिसून येते.

*****

# संदर्भ ग्रंथ सूची


| | | |
|---|---|---|
| १) | कुलकर्णी गो. म. | ' मराठी समीक्षेची वाटचाल '<br>स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे |
| २) | कुलकर्णी गो. म. | ' मराठी साहित्यातील स्पंदने '<br>सुवर्ण प्रकाशन, पुणे<br>प्रथम आवृत्ती, १९८५ |
| ३) | कुलकर्णी वा. ल. | ' श्रीपाद कृष्ण वाङ्मय दर्शन '<br>पॉप्युलर प्रकाशन, मुंबई<br>द्वितीय आवृत्ती, १९७५ |
| ४) | खांडेकर भालचंद्र<br>गोविलकर लीला | ' अभिनव साहित्यप्रकाश '<br>अनमोल प्रकाशन, पुणे २<br>प्रथम आवृत्ती, ऑगस्ट १९७८ |
| ५) | (संपा.) खांडेकर वि. स.<br>माडखोलकर ग. त्र्य.<br>खानोलकर गं. दे. | ' कोल्हटकरांचा लेखसंग्रह '<br>प्रकाशन गं. दे. खानोलकर<br>गिरगाव, मुंबई नं. ४ |
| ६) | (संपा.) विलास खोले | ' विसाव्या शतकातील मराठी समीक्षा '<br>प्रतिमा प्रकाशन, पुणे<br>प्रथम आवृत्ती, २००४ |
| ७) | (संपा.) गोखले म. वि. | ' मराठी टीकाकार '<br>यशोदा प्रकाशन, पुणे<br>प्रथम आवृत्ती, १९७९ |

८) <u>गोडबोले ना. वा.</u> <u>जोगळेकर गं. ना.</u> — ' <u>साहित्य समीक्षा- स्वरूप आणि विकास</u>'
व्हिनस प्रकाशन, आवृत्ती पहिली
सप्टेंबर १९८१

९) <u>पवार गो. मा.</u> <u>हातकणंगलेकर म. द.</u> — ' <u>निवडक मराठी समीक्षा</u> '
साहित्य अकादमी, नवी दिल्ली
प्रथम आवृत्ती, १९९९

१०) <u>पाटणकर रा. भा.</u> — ' <u>सौंदर्यमीमांसा</u> '
मौज प्रकाशन, आवृत्ती चवथी
डिसेंबर २००६

११) <u>(संपा.) भागवत श्री. पु.</u> — ' <u>साहित्य अध्यापन आणि प्रकार</u> '
पॉप्युलर मौज प्रकाशन, मुंबई
प्रथम आवृत्ती, १९८७

१२) <u>(संपा.) मेदककर प्रकाश</u> — ' <u>मूल्य संकल्पना आणि साहित्य विचार</u> '
कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद
प्रथम आवृत्ती २००४

१३) <u>वासमकर वि. दा.</u> — ' <u>मराठीतील कलावादी समीक्षा</u> '
पीएच. डी. (मराठी) पदवीसाठी
शिवाजी विद्यापीठात सादर केलेला प्रबंध,
१९९८

१४) <u>[illegible]</u> — ' <u>[illegible]वेक</u> '
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
प्रथम आवृत्ती १९६५


891.463
VAR
T15426

*****